मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

जा.क्र. मंत्री/ऊर्जा/पालकमंत्री, नागपूर 27

दिनांक : 2.9.2015

## जिल्हयाचे संकेतस्थळ – प्रगतीचा साथीदार

शहर व जिल्हयाचा इतिहास हा शेवटी सनावळया, राजवटी, राजे, दरबारी, इमारती, वाडे, वास्तू वा स्मारकांचा तेवढा इतिहास नसतो, तर त्या त्या शहरातील जिवंत माणसांनी सचेत केलेल्या त्या त्या काळातील जीवन व्यवहाराचाही तो आलेख असतो.

नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर हा सर्व इतिहास उभा करण्यात आलेला आहे. नागपूर हे खऱ्या अर्थाने संपूर्ण देशातील एक धर्मनिरपेक्ष–बहुभाषिक–बहुसांस्कृतिक–बहुआयामी समाजाच्या सहिष्णूतेचे तसेच राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक आहे.

शून्य मैल स्तंभ, सिताबर्डी किल्ला, तेलंगखेडी, रामटेक, धापेवाडा, आदासा, दीक्षाभूमी, डॉ. हेडगेवार स्मारक, ताजबाग दर्गा, ड्रॅगन पॅलेस, उच्च न्यायालय, मिहान प्रकल्प, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ ही जिल्हयाची मानचिन्हे आहेत.

विविध विभागातून देशाच्या या नाभिस्थानी असलेल्या शहरात विविध नोकरी–कला–व्यवसाय यांच्या निमित्ताने येणारी विविध प्रांतातील माणसे या शहराच्या व जिल्हयाच्या प्रेमात पडतात. जगात ओळखल्या जाणाऱ्या नागपुरी संत्र्याच्या रूचकर चवीमुळे नावलौकिकात भरच पडली आहे.

अशा या जिल्हयाच्या माहितीचे संकेतस्थळ अधिक समृध्द व अचूक होण्यासाठी जिल्हा प्रशासन सतत प्रयत्नशील आहे. सामान्य नागरीक तसेच या शहरात नव्याने येणारे पर्यटक व नागरिकांना संकेतस्थळावरील माहितीचा निश्चितपणे फायदा होतो, यात शंका नाही. सामान्य शेतकऱ्यापासून छोटया मोठया

मंत्री
उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :

उद्योजकापर्यंत हे संकेतस्थळ पोहोचेल या दृष्टीने प्रशासन प्रयत्नशील आहे. दैनंदिन व्यवहारात कोणतीही अडचण निर्माण होउ नये, कलापव्यय टळावा यासाठी हे संकेतस्थळ उपयोगी ठरणारे आहे.

नागरिकांना सर्व प्रकारची माहीती सहज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे त्यांचे जिवन अधिक सुखकारक होणार आहे. सर्वांना हे संकेतस्थळ अधिक लाभदायक ठरेल आणि नागपूरच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलेल ही अपेक्षा व्यक्त करून आपना सर्वांना शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

(चंद्रशेखर बावनकुळे)
पालकमंत्री